# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**अत्यंत तातडीचे/महत्वाचे** क्रमांक संगाबाअवि/३/संपमूम/३४७/२०२१
दिनांक : २६/०६/२०२१

प्रति,

प्राचार्य / विभागप्रमुख / मानद संचालक,
सर्व संलग्नीत संबंधीत महाविद्यालये, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदवी शैक्षणिक विभाग
मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा.

**विषय : उन्हाळी-२०२१ परीक्षेकरीता ऑनलाईन परीक्षा आवेदन पत्र भरण्याबाबत.**

होदय/महोदया,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, **बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी. सत्र-२, ४, व ६ या परीक्षांकरीता नियमित विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र व वार्षिक अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे (Doctor of Pharmacy Pat-I to V, Diploma in Human Rights, Diploma in Taxatation, Diploma in Business Management, Diploma in Finance Management, Diploma in Marketing Management) आवेदनपत्र ऑनलाईन प्रणालीद्वारे भरण्यात यावे.**

१) विद्यार्थ्यांनी आपले ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्र त्यांना महाविद्यालयाने यापूर्वी हिवाळी-२०२० परीक्षेकरीता वितरित केलेल्या Login ID आणि Password द्वारेच भरण्यात यावे.

२) विद्यार्थ्यांना Login ID आणि Password माहिती नसल्यास, अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयाने त्यांच्या पोर्टलमध्ये Login करुन Session Winter-2020 Select जे विद्यार्थी यापूर्वी ज्या सत्राला नियमित होते, ते सत्र निवडावे, अशा विद्यार्थ्यांचे Login ID आणि Password Student Login Details या Panel वरुन परीक्षेनिहाय उपलब्ध करुन घ्यावेत, व विद्यार्थ्यांना वितरित करण्यात यावे.

३) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या Login ID आणि Password द्वारे **https://sgbau.ucanapply.com** या संकेतस्थळावर जाऊन Student या Tab वर Click करुन आपल्या Login ID आणि Password ने Login करुन ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्रे भरण्यात यावे. व विद्यार्थ्यांनी सदर भरलेल्या परीक्षा आवेदनपत्राची Print out काढून परीक्षा शुल्कासह महाविद्यालयात जमा करावी. **{विद्यार्थ्यांनी आवेदनपत्राची Print out काढून महाविद्यालयात जमा न केल्यास विद्यार्थ्यांना परीक्षा क्रमांक (Roll No.) प्राप्त होणार नाही, याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.}**

४) विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन भरल्यानंतर व विद्यार्थ्याकडून परीक्षा आवेदनपत्राची Print out काढून व परीक्षा शुल्क प्राप्त झाल्यानंतर महाविद्यालयाने Student Verification या Panel वर जाऊन संबंधीत परीक्षेची माहिती भरुन Form Type या Option ला प्रेस करुन Exam Form Select करुन विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्रे Verified करणे अनिवार्य राहील. (महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे Verified केल्याशिवाय परीक्षा क्रमांक (Roll No.) जनरेट होणार नाही, याची नोंद घ्यावी.)

५) महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्र Verified करुन विद्यार्थ्यांची यादी Report Section मधून Student Verification मध्ये जाऊन Exam Form Select करुन विद्यार्थ्याने ऑनलाईन परीक्षा आवेदन पत्र भरल्याची यादी काढावी.

६) Verification झाल्यानंतर परीक्षा आवेदनपत्रांची यादी विहित केलेल्या परीक्षा शुल्कासह व विहित केलेल्या तारखेच्या आंत विद्यापीठात सादर करावी. (महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे परीक्षाआवेदनपत्राची Print out विद्यापीठात जमा करु नये.)

७) ज्या नियमित विद्यार्थ्यांना ऑनलाईन उन्हाळी-२०२१ परीक्षेकरीता परीक्षा आवेदनपत्र भरण्याकरीता Login ID आणि Password महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले नसतील (Gap Students), अशा विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात जाऊन ऑनलाईन पोर्टलमार्फत Registration करुन महाविद्यालयाकडून Login ID आणि Password घेण्यात यावा.

८) उपरोक्त ७ करीता महाविद्यालयांनी अशा विद्यार्थ्यांचे उन्हाळी-२०२१ परीक्षांचे परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन भरण्याकरीता महाविद्यालयांनी त्यांच्या Login ID ने Login करुन Confidentail Section Panel वर क्लिक करुन Gap Student Registration वर जाऊन अशा विद्यार्थ्यांचे सर्वप्रथम Registration करणे आवश्यक आहे. Registration करतेवेळी विद्यार्थ्यांचा E-mail ID व नवीन Password टाकणे आवश्यक राहील. विद्यार्थांच्या E-mail ID वर आलेला Activation Code Activate करुनच विद्यार्थ्यांना परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन भरता येईल. व सदर E-mail ID व Password हाच विद्यार्थ्यांचा Login ID व Password परीक्षा आवेदनपत्रे भरण्याकरीता कायम राहील.

९) उन्हाळी-२०२१ परीक्षेकरीता नमूद केलेल्या परीक्षांकरीता नियमित विद्यार्थ्यांनी जर ऑफलाईन परीक्षा आवेदनपत्रे सादर केली असतील, तर ती स्वीकारण्यात येणार नाही. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांची राहील. त्याकरीता नियमित विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्रे सादर करणे अत्यावश्यक आहे.

१०) विद्यार्थ्यांना SBI Collect या ऑनलाईन प्रणालीचा परीक्षा शुल्क भरण्यासाठी उपयोग करता येईल. त्याकरीता विद्यार्थ्यांनी Google Search मध्ये SBI Collect टाईप करुन SBI Collect ची Window ओपन झाल्यानंतर ऑनलाईन शुल्क भरण्याची प्रोसेस करण्यात यावी.

११) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्याची पावती महाविद्यालयाकडे सादर केली असेल, तर महाविद्यालयाने SBI Collect History मध्ये जाऊन Online Receipt मधील DU Reference No. टाकून शहानिशा करुनच परीक्षा आवेदनपत्र स्वीकारण्यात यावे.

१२) सर्व परीक्षेतील माजी विद्यार्थ्यांकरीता उन्हाळी-२०२१ परीक्षेकरीता परीक्षा आवेदनपत्र हे ऑफलाईन पद्धतीने महाविद्यालयीन स्तरावर स्वीकारण्यात यावेत. परीक्षा आवेदनपत्र पोष्टाद्वारे विद्यापीठात स्वीकारले जाणार नाही, तसेच विद्यापीठामध्ये सुद्धा प्रत्यक्षरित्या परीक्षा आवेदनपत्र स्वीकारल्या जाणार नाही. याबाबतची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन भरण्याचे पोर्टलवर **दिनांक २८/०६/२०२१ दुपारी १२.३० पासून तर दिनांक ५/०७/२०२१ पर्यंत भरुन घेण्यात यावेत.** याबाबतची माहिती संबंधीत विद्यार्थ्यांना देवून विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्र स्वीकारुन पुढील कार्यवाही करावी, ही विनंती.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करुन परीक्षा संचालनास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला,

(डॉ.हेमंत आर.देशमुख)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ